# महाराष्ट्र राज्य शुश्रुषा व परावैद्यक शिक्षण मंडळ

वैद्यकीय शिक्षण व संशोधन शासकीय दंत महाविद्यालय व रुग्णालय इमारत,चौथा मजला,सेंट जॉर्जेस रूग्णालय आवार, पी.डीमेलो रोड, फोर्ट, मुंबई - ४०० ००१. ई-मेल- msbnpe@gmail.com ,दुरध्वनी : ०२२.२२६२०३६०

**MAHARASHTRA STATE BOARD OF NURSING AND PARAMEDICAL EDUCATION**

Directorate of Medical Education and Research, 4th Floor, St.Georges Hospital Campus, P.D'Melo Road, Fort, Mumbai-400 001
E-mail- msbnpe@gmail.com, Telephone - 022-22620360

क्र.मराशुश्रुवपशि/सुचना/ २९९ /२०१८ दिनांक- २ २/०९/२०१८

## जाहिर सुचना

## ए.एन.एम/जी.एन.एम नर्सिंग अभ्यासक्रम प्रथम वर्षे परिक्षा सप्टेंबर २०१८

महाराष्ट्र राज्य शुश्रुषा व परावैद्यक शिक्षण मंडळा मार्फत सन २०१७ मध्ये ए.एन.एम/जी.एन.एम अभ्यासक्रमास प्रवेश घेतलेल्या राज्यातील सर्व विद्यार्थ्यांची प्रथम वर्षाची परिक्षा हि या शिक्षण मंडळा तर्फे २५ सप्टेंबर २०१८ पासून घेण्यात येणार आहे. याबाबत सर्व तयारी या शिक्षण मंडळा तर्फे पूर्ण झालेली असून सर्व सबंधीत विद्यार्थी,पालक,प्राचार्य,तसेच संस्थाचालक यांना पुरेशा मुदतीत या आगोदरच कळविण्यात आलेले आहे. सदर परिक्षेबाबत सोशल मिडीयावर काही समाज कंटकांनी वेगवेगळे संदेश, जाहीर नोटीस प्रसिध्द केलेली असून या शिक्षण मंडळाच्या सदरिल परिक्षेस बसणा-या सर्व विद्यार्थ्यांची दिशाभूल करण्याचा त्यांचा जोरात प्रयत्न चालू आहे. सदरच्या परिक्षा राज्यशासनाने नियमाप्रमाणे स्थापन केलेल्या शिक्षण मंडळामार्फत घेण्यात येवू नयेत व त्या आपल्याच अधिकारामार्फत घेण्यात याव्यात यासाठी अशी चूकीची, बेकायदेशीर, नियमबाहय, विद्यार्थी अहिताच्या हेतूने त्यांचा प्रयत्न चालू आहे. याबाबत सर्व संबंधीत विद्यार्थी, पालक, प्राचार्य, तसेच संस्थाचालक यांना खालील प्रमाणे कळविण्यात येत आहे.

१. सदर परिक्षेसंबंधीत सत्य माहिती हि फक्त याच शिक्षण मंडळाच्या वेबसाईटवर असेल.

२. महाराष्ट्र राज्य शुश्रुषा व परावैद्यक शिक्षण मंडळाची स्थापना ही राज्य शासनाने विधानसभेची तसेच राज्याच्या न्याय व विधी विभागाची मान्यता घेऊन राजपत्रात प्रसिध्द करून केलेली आहे.

३. महाराष्ट्र राज्य शुश्रुषा व परावैद्यक शिक्षण मंडळाच्या या परिक्षेव्दारे देण्यात येणा-या पदविका, प्रमाणपत्र यास भारतीय परिचर्या परिषदेची( INDIAN NURSING COUNCIL ) मान्यता आहे.

४. सदरच्या परिक्षेव्दारे पदविका, प्रमाणपत्र मिळणा-या महाराष्ट्र राज्य शुश्रुषा व परावैद्यक शिक्षण मंडळाच्या विद्यार्थ्यांना महाराष्ट्र परिचर्या परिषदेची ( MAHARASHTRA NURSING COUNCIL ) नोंदणी प्राप्त होणार आहे.

५. सदरच्या परिक्षेव्दारे विदयार्थ्यांना महाराष्ट्र परिचर्या परिषदेव्दारे नोदणी मिळणार नाही, असे धडधडीत खोटारडे, चूकीचे, बेकायदेशीर, दिशाभूल करणारे व विद्यार्थ्यांची फसवणूक करणारे विधान काहि समाजकंटक करत आहेत, यावर कोणीही विश्वास ठेवू नये.

६. महाराष्ट्र राज्य शुश्रुषा व परावैद्यक शिक्षण मंडळ हे जबरदस्तीने बेकायदेशीरपणे परिक्षा घेण्याचा प्रयत्न करीत आहे, असेही धडधडीत खोटारडे व बेकायदेशीर विधान हि मंडळी करीत आहे. शिक्षण मंडळ हे शासनाने कायदा करून स्थापन केलेले असल्यामुळे सदरच्या परिक्षा हया नियमाप्रमाणे कायदेशीर आहेत.

७. सदरच्या परिक्षेस न बसणा-या विद्यार्थ्यांची शिष्यवृत्ती तात्काळ बंद करण्यात येईल, याची नोंद घ्यावी.

वरिल सर्व कायदेशीर बाबी पाहता महाराष्ट्र राज्य शुश्रुषा व परावैद्यक शिक्षण मंडळाच्या दिनांक २५/०९/२०१८ पासून सूरू होणा-या ए.एन.एम/ जी.एन.एम प्रथम वर्षाच्या परिक्षेस जर या समाज कंटकांच्या चूकीच्या व बेकायदेशीर माहिती मुळे कोणी या परिक्षेस न बसल्यास त्यांचे आतोनात शैक्षणिक नुकसान होणार आहे. या परिक्षेस गैरहजर राहणा-या विद्यार्थ्यांच्या शैक्षणिक नुकसानीस, बेकायदेशीर व चूकीचा संदेश पाठविणारे/ पसरविणारे लोक त्याची जबाबदारी स्विकारणार नाहीत, तर हया होणा-या शैक्षणिक नुकसानीस, परिक्षेस न बसणारे विद्यार्थी व त्यांचे पालक हेच जबाबदार राहतील, याची सर्वानी नोंद घ्यावी.

या परिक्षेस बसणा-या सर्व विद्यार्थ्यांच्या नोंदणीची व पदविका, प्रमाणपत्राच्या मान्यतेची संपूर्ण जबाबदारी हि या महाराष्ट्र राज्य शुश्रुषा व परावैद्यक शिक्षण मंडळाची राहणार आहे. सर्व संबंधीत विद्यार्थी, पालक , प्राचार्य, संस्थाचालक यांनी याची नोंद घ्यावी.

s/d
संचालक
महाराष्ट्र राज्य शुश्रुषा व परावैद्यक शिक्षण मंडळ